---

एका यथातथा गायकाचं स्टेजवर गाणं असतं.
एक बेरकी काका सारखं वन्स मोअर देतात.
गायकाला छान वाटतं.
पण वन्स मोअर संपत नाही.
मग तो विचारतो, “एवढ्या वेळा वन्स मोअर का?”
बेरकी काका : नीट म्हणेस्तोवर आम्ही वन्स मोअर देणारच ना !

---

एकदा एका महिलेने कस्टमर केअरला फोन केला
आणि रागात म्हणाली, "मागील ३ तासांपासून प्रयत्न करतेय.
तुमच्या कंपनीचं इंटरनेट चालत नाही. सांगा, आता काय करू ?"
कस्टमर केअर : मावशी, थोडं घरचं काम करून घ्या.

---

गुरुजी : काय रे वर्गात डुलक्या देतोयस ?
विद्यार्थी : नाही गुरुजी, गुरुत्वाकर्षणाने डोकं खाली पडतंय.

---